# कृषिविद्या विभाग
# डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला.

जा.क./विप्र./कृविवि./आस्था/। 380/2023

दिनांक: - 13 / 12 /2023

## निविदा सूचना

प्रति,

---------------------------

---------------------------

---------------------------

**विषय :- हवामान वेधशाळेत सन २०२३-२४ या आर्थिक वर्षात कंत्राटी पध्दतीने बहयस्त्रोतामार्फत मनुष्यबळ (कुशल/ अकुशल) पुरविण्याकरीता दरपत्रक सादर करणेबाबत....**

वरील विषयाच्या अनुषांगाने हवामान वेधशाळा, हवामान खाते, कृषीविद्या विभाग, डॉअकोला .वि. कृ .दे .पं . येथे दैनंदिन कामे व रखवालदारी कामाकरिता सन २०२३-२४ बहयास्त्रोताकडून कंत्राटी पद्धतीने एक अकुशल व एक कुशल रोजंदार मजूर पुरविण्याचे निवीदा दरपत्रक सोबत जोडलेल्या प्र-पंत्रात तपशील प्रमाणे **दिनांक २०/१२/२०२४** पर्यंत कार्यालयीन वेळेत सीलबंद लिफाफ्यामध्ये संबंधित दस्तावेजसह खालील दिलेल्या अटी व शर्तीस अनुसरून सादर करावे.

| अ.क्र. | मनुष्यबळ | संख्या | कामाचा वेळ | दर प्रति महिना |
|---|---|---|---|---|
| १ | कुशल कामगार (मजूर) | प्रति व्यक्ती | ८ तास | |
| २ | अकुशल कामगार (मजूर) | प्रति व्यक्ती | ८ तास | |

**अटी व शर्ती**

१. निविदा पत्रक कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ५.०० या वेळेस स्वीकारल्या जातील.

२. निविदा/कोटेशन विभाग प्रमुख, कृषिविद्या विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला यांच्या नावाने सीलबंद लिफाफ्यात पाठवावी.

३. कंत्राटी पध्दतीने मजूर लावण्याची व्यवस्था संबंधित निविदा धारकांनी करावी.

४. हवामान वेधशाळा, कृषिविद्या विभाग, डॉ.पं.दे.कृ.वि. अकोला येथे रखवालदारी करिता असताना नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने लागू केलेल्या नुकसान निकषांप्रमाणे नुकसान भरपाई संबंधित निविदा धारकाकडून वसूल करण्यात येईल.

५. कंत्राटी पध्दतीने मजूर यांना नुकसान झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित निविदा धारकाची राहील.

६. कंत्राटी पध्दतीने मजूर लावताना शासनाने घालून दिलेल्या अटी व नियमांचे तंतोतंत पालन संबंधित निविदा धारकांना करावे लागेल.

७. विभागावर कोणताही वाद विवाद निर्माण झाल्यास कोर्ट कचेरीत न जाता त्याबाबतचा अंतिम निर्णय विद्यापीठ विधी विभागाचे अधिकारी / मा. शिक्षण संचालक तथा अधिष्ठाता (कृषी) यांच्या समक्ष मिटविला जाईल व अंतिम निर्णय मा. शिक्षण संचालक तथा अधिष्ठाता (कृषी) यांचा राहील व तो सर्वांना मान्य करणे बंधनकारक राहील.

८. विभागावर देण्यात आलेले काम पूर्ण करण्यात यावे, कामा बाबत विभागावरून तक्रार आल्यास किंवा काम सोडून गेल्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.

९. कृषी विद्यापीठ प्रशासन वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमांचे पालन करणे निविदा धारकांना बंधनकारक राहील

१०. मान्यता देण्यात आलेल्या निविदा धारकांनी देयक सादर करतेवेळी बँक खाते क्रमांक बाबतची संपूर्ण माहिती देयक सादर करतेवेळी देण्यात यावी.

११. निविदा सूचनांची छायांकित प्रत निविदा दर सादर करण्यात येऊ नये. तसे केल्यास निविदा रद्द करण्यात येईल.

१२. कंत्राटी दाराने निविदा सादर करताना संस्थेचे नोंदणी पत्र, भविष्यनिर्वाह निधी पत्र, विमा सुरक्षा पत्र, मागील तीन वर्षाचे जी.एस.टी. भरणा केल्याचे पत्र, पेन कार्ड व आयकर विवरण पत्र या दस्ताऐवजसह सीलबंद देण्यात यावे.

१३. कंत्राटी दराने विविध कामाकरिता लावण्यात आलेल्या कंत्राटी मजुरांची व त्यांच्या कामाची व्यवस्था हि कंत्राटी दरानेच पाहण्यात यावी काम समाधानकारक पूर्ण असल्यास देयके पारित करण्यात येईल.

१४. निविदा प्रक्रियेतील निविदा मंजूर करण्याचे अधिकार पूर्णतः विभाग प्रमुख, कृषिविद्या विभाग, डॉ. पं.दे कृ.वि., अकोला कार्यालयाने राखून ठेवलेले आहे व ती अट निविदा धारकास बंधनकारक राहील.

वरील सर्व अटी व शर्ती मान्य असणाऱ्या निविदा धारकांनीच नमूद कामाचे निविदा सादर करण्यात यावी.

**विभाग प्रमुख**
कृषिविद्या विभाग
डॉ. पं.दे.कृ.वि.,अकोला.

प्रतिलिपी : प्रभारी अधिकारी (ARIS Cell ) डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला यांना सादर निविदा विद्यापीठ संकेतस्थळावर अपलोड करण्याकरिता अग्रेषित.